## वाहतुक बदल अधिसुचना

जा.क्र./पोउआ/वाहतुक/नियोजन/2639C3/२०२३ पिंपरी चिंचवड शहर दिनांक 14/07/२०२३

चांदणी चौक या ठिकाणी मागील ०८ महिन्यापासून भारत सरकार, एनएचएआय व एनसीसी यांचे मार्फतीने ब्रिज व रस्त्याचे नूतनीकरणाचे कामकाज चालू असुन चांदणी चौक या ठिकाणी मुख्य गर्डर टाकण्याचे काम करण्यात येणार आहे.

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन प्राप्त हरकती व सुचनांचा विचार करुन मी काकासाहेब डोळे, पोलीस उप आयुक्त, परि २, अति.कार्य. पोलीस उप-आयुक्त वाहतुक शाखा, पिंपरी चिंचवड शहर, यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन सदरचे काम पुर्ण होईपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

<u>संबंधीत वाहतुक विभाग</u>

१. मुंबई कडुन येणारी जड वाहतूक मुंबई पुणे एक्सप्रेस वेवर तळेगाव टोलनाका या ठिकाणी व मुंबई पुणे जुना हायवे वर सोमाटणे टोलनाका या ठिकाणी थांबविण्यात येणार आहे.

२. मुंबई पुणे एक्सप्रेसवे व मुंबई पुणे जुना हायवे येथुन येणारी चारचाकी हल्की वाहने ही भुजबळ चौक,राजीव गांधी ब्रिज मार्गे व चांदणी चौक विवा हॉटेल या मार्गाने कात्रजकडे वळविण्यात येणार आहे.

३. मुंबई पुणे एक्सप्रेसवे, मुंबई पुणे जुना हायवे व किवळे ब्रिज ते राधा चौक या दरम्यान येणारी जड वाहने ही भुजबळ चौक, राजीव गांधी ब्रिज मार्गे जावु देणे अशा प्रकारे वाहतूकीचे नियोजन करण्यात आले आहे.

वरील आदेशाची दिनांक १५/०७/२०२३ पासुन २१/०७/२०२३ या कालावधीत रात्री ००.३० (सोमवारी रात्री १२.३० पासुन ) ते पहाटे ०३.३० वाजेपर्यंत वैध राहील.

तरी नागरीकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा, वरील प्रमाणे वाहतुक बदलाबाबत वॉर्डन व वाहतुक कर्मचारी यांना सहकार्य करावे असे अवाहन पिंपरी चिंचवड शहर, वाहतुक शाखा यांचे मार्फतीने करण्यात येत आहे.

(काकासाहेब डोळे)
पोलीस उप आयुक्त,परि २
अति.कार्य. वाहतूक पिंपरी चिंचवड

प्रति,

जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी,
नविन मध्यवर्ती इमारत, पुणे – ०१

प्रत:-

१)पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.

२/- सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमानपत्रातून प्रसिध्द करण्याची विंनती करावी.

२) सहा. पोलीस आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी चिंचवड शहर.

३) पोलीस निरीक्षक, संबंधीत वाहतूक विभाग पिंपरी चिंचवड शहर.

२/- सदर ठिकाणी वरील वाहतूक वळविणारे फलक बसविणेची कार्यवाही करावी.

Scanned with CamScanner